## प्रत्येक जिल्ह्यात हेक्टरी २३ क्विंटलप्रमाणे कापूस खरेदी होणार; मुख्यमंत्र्यांचे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांची विधानसभेत माहिती

नागपूर, : अद्ययावत तंत्रज्ञान तसेच सिंचन प्रणालीचा वापर करून राज्यातील शेतकरी कापसाचे उच्चतम उत्पादन घेतो त्यानुसार राज्यात किमान हमीभाव योजनेंतर्गत हेक्टरी कापूस खरेदी मर्यादा वाढवण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत होती. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी राज्यात सर्व जिल्ह्यासाठी उच्चतम उत्पादकतानुसार हेक्टरी २३ क्विंटल उत्पादकता निश्चित करून त्याप्रमाणे कापूस खरेदी करण्यात यावा, असे निर्देश नुकतेच दिले होते. त्यानुसार आता प्रत्येक खरेदी केंद्रावर हेक्टरी २३ क्विंटल प्रमाणे कापूस खरेदी होणार आहे, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत निवेदन करताना दिली शेतकरी सुधारित सिंचन पद्धती आणि आधुनिक शेती तंत्रांचा वापर करून अधिक उत्पादन घेत आहेत. मात्र, प्रत्यक्षातील जादा उत्पादन खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणल्यावर, उत्पादकता मर्यादा कमी असल्याने अनेक शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे ही मर्यादा वाढविण्याची मागणी सातत्याने होत होती. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पणन मंत्री रावल तसेच विविध लोकप्रतिनिधींची बैठक झाली. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी हेक्टरी २३ क्विंटल प्रमाणे कापूस खरेदी करण्याचे निर्देश दिले. पीक कापणी प्रयोगांतील उच्चतम २५ टक्के उत्पादन विचारात घेऊन लातूर, वर्धा व गडचिरोली या उच्च उत्पादन असलेल्या तीन जिल्ह्यांची सरासरी २३ क्विंटल आहे त्यानुसार सर्व जिल्ह्यासाठी २३ क्विंटल अशी राज्यभर मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ही उत्पादकता मर्यादा फक्त खरीप २०२५ मध्ये उत्पादित कापूस एमएसपी खरेदीसाठीच लागू राहणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचेही पणन मंत्री रावल यांनी सांगितले.

## समाजसेवक,आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील साबला गावचे भूमिपुत्र समाजसेवक आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.प्रा.



शाळा,आनंदवाडी वस्ती, साबला या विद्यालयातील सर्व विद्यार्थांना शालेय,शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करुन समाजसेवक तथा आदर्श शिक्षक नरारे काकडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला.,डिजिटल होल्डिंग, फटाक्याची आताशबाजी न करता अनावश्यक खर्च टाळून विविध सांस्कृतिक उपक्रम घेऊन समाजसेवक तथा आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांचा ठिकठिकाणी वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक व सहशिक्षक , लखन राऊत व विद्यायातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# बँक मित्र संघटनेचा आज न्याय हक्कासाठी नागपूर विधान भवनावर धडक मोर्चा



नागपूर/प्रतिनिधी- नागपूर येथे महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून बँक मित्र जमा होऊन न्याय हक्कासाठी विधान भवनावर धडक मोर्चा काढून बँक मित्रांच्या व्यथा देविदास तुळजापूरकर यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिल्या. विविध मागण्याचे निवेदन मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केले.

यावेळी महाराष्ट्रातून विविध संघटनेने जाहीर पाठिंबा दिला यावेळी बोलताना तुळजापूर यांनी बँक मित्रांना यापुढे मुंबई येथे मोर्चा काढण्याचा जाहीर केले. यावरही शासनाला जाग न आल्यास २०२६ मध्ये दिल्ली येथील जंतर-मंतर या ठिकाणी आपण जाणार असल्याचे सांगितले व बँक मित्रांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात डोंगराळ भागात, अति ग्रामीण वस्त्यांत, उन्हात, वाऱ्यात, मुसळधार पावसात दिवसाचे चोवीस तास, आठवड्याचे सातही दिवस, वर्षाचे ३६५ दिवस अखंड सेवा करणारे आम्ही बैंक मित्र, आज नाईलाजास्तव रस्त्यावर आलो आहोत.

कारण आमची वेदना, आमची कैफियत, आमचा संघर्ष सरकारपर्यंत आणि समाजापर्यंत पोहोचवणे आता जीवन-मरणाचा प्रश्न बनला आहे.

आम्ही कामाचे तास पाहिले नाहीत पण आमच्यासाठी कोणतेही हक्क नाहीत.रजा नाही, साप्ताहिक सुट्टी नाही, किमान वेतन नाही, कोणतीही सेवा-सुरक्षितता नाही, मेडिकल नाही,वार्षिक वाढ नाही,

अपघात /जीवन विमा नाही, कामासाठी जागा आम्ही देतो, मशीन, लॅपटॉप, डेटा,

स्टेशनरी सगळे आमचेच प्रवास खर्च आमचा आणि मिळकत तुटपुंजी !त्यातही, जिथे एक बँक मित्राचा उदरनिर्वाह होत नाही, तिथे ठेकेदारांनी दोन-चार नवे बँक मित्र नेमल्याने आमचे

उत्पन्न आणखी कोसळले. अनेकजण १०-१५ वर्षे अखंड काम करत आहेत पण त्याचे फळ? उत्पन्न कमी, ताण वाढलेला !

अनेक बँक मित्रांनी हताश होऊन काम सोडले, तर काहींनी सर्व्हिस प्रोव्हायडरच्या जाचाला कंटाळून आपले आयुष्य संपवले-ही वेदनादायक वस्तुस्थिती आहे.

अशा या परिस्थितीत आमच्या अस्तित्वासाठी आम्ही संघटनात्मक पातळीवर उभे राहिलो.

महाराष्ट्रातील सर्व बँक मित्र एकत्र येऊन स्थापन केलेल्या आमच्या संघटनेला एक वर्ष पूर्ण झाले आहे. आज आम्ही राज्याचे मुख्यमंत्री राज्य बँकर्स समितीचे अध्यक्ष आणि जनतेचे पालक यांच्या दरवाजात उभे आहोत. फक्त एवढ्यासाठी की आम्हाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळावा आमचे योगदान विसरू नका,आज राज्यातील वीस हजारांहून अधिक बँक मित्र सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या माध्यमातून कार्यरत आहेत.

राज्य सरकारच्या प्रत्येक कल्याणकारी योजनेत आमची भूमिका अनन्यसाधारण आहे.

कोरोना महामारीच्या काळात आम्ही जीव धोक्यात घालून सेवा केली.

नोटबंदीच्या काळात घाबरलेल्या जनतेला आम्ही आधार दिला.

लाडकी बहीण योजना, किसान कल्याण, गरीब कल्याण डीबीटी, या सर्व योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यामध्ये बँक मित्रांची महत्त्वाची भूमिका सिद्ध झाली आहे.आज आम्ही सरकार, सर्व राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी आणि जनतेपुढे हात जोडून आवाहन करत आहोत.

आमची वेदना, आमचा संघर्ष ऐका.आमचा आवाज सरकार आणि बँकर्सपर्यंत पोहोचवा.

आम्हाला किमान मानवी हक्क मिळवून द्या. आमच्या कार्याचा सन्मान करून, आमच्यासाठी सुरक्षित आणि सन्मानजनक जीवनाची हमी द्या.

आम्ही ही या समाजाचेच घटक या राज्याचेच नागरिक.

आमच्यासुद्धा हातावर मुले-बाळं आहेत, कुटुंब आहे, आमचे स्वप्नं आहेत, आणि साधेपणाने सन्मानाने जगण्याचा हक्क आहे.आज आम्ही लढत आहोत फक्त आपल्यासाठी केलेल्या आमच्या सेवेला न्याय मिळावा म्हणून. आपण आमच्यासोबत उभे राहाल हीच आमची आशा आणि विश्वास आहे.आपले महाराष्ट्र राज्यातील तमाम बँक मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयुष्यभर मुंडे साहेबांनी जनहितासाठी संघर्ष केला - ऋषिकेश कराड

लातूर - आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब,



सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी न्याय हक्कासाठी संघर्ष करणारे लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीदिनी १२ डिसेंबर शुक्रवार रोजी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मुंडे साहेबांसोबत राहून कष्टाने, मेहनतीने भारतीय जनता पार्टी वाढवण्यासाठी काम केलेल्या रेणापूर येथील भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

रेणापूरचे तत्कालीन आमदार, मराठवाड्याचे भूमिपुत्र, महाराष्ट्राचे लोकनेते केंद्रीय माजी ग्रामविकास मंत्री स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती रेणापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे १२ डिसेंबर २०२५ शुक्रवार रोजी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद देरेकर, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, वसंत करमुडे, श्रीकृष्ण पवार, शहराध्यक्ष अच्युत कातळे, भाजयुमो शहराध्यक्ष गणेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांसोबत प्रत्येक कार्यात सहभागी होऊन भाजपाच्या विस्तारासाठी खांद्याला खांदा लावून काम करणारे रेणापूर शहरातील काशिनाथ पाटील, अंबादास राठोड, सूर्यकांत मोटेगावकर, जयप्रकाश हलकुडे, बापूसाहेब कुलकर्णी, गंगाधर पाटील, नागुबाई आलापुरे, किशोर सोमाणी, ईश्वर मंत्री, एकनाथ आकनगिरे, चंद्रकांत कातळे, पंचाक्षरी गिरवलकर, दिनकर राठोड, लिंबराज गायकवाड, लक्ष्मण इंगे, रविकांत औसेकर, उत्तम घोडके, नरहरी डावळे, सुधीर तोडकरी, अंगद कातळे, रमाकांत वाघमारे, विठ्ठल औसेकर, शेख शहेनशाह, दिलीप राजे, शिवाजी भावे, सत्यपाल राऊत, दिलीप आकनगिरे, सुरेश खोबरे, सुभाष राठोड, रावसाहेब कातळे, रमेश वरवटे, अमृतेश्वर स्वामी, दत्ता बाळे, शेख खुदूस, राजकुमार रायवाडे, हनुमंत भालेराव, साताप्पा खोबरे, नंदकुमार बंडे, रमेश काळे, जगन्नाथ कातळे, रावसाहेब चव्हाण, नागनाथ कांबळे, मधुकर माळेगावकर, धनंजय वाघे, गोविंद कुडके, रंगनाथ एकुरके, बळीराम राठोड, गोपीदादा आकनगिरे, गोविंद काळे, ज्ञानोबा सातपुते, दगडू भिकाने, बालाजी ईस्ताळकर यांचा भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते शाल तुळशीचे रोपटे आणि सन्मानचिन्ह भेट देऊन यथोचित सत्कार केला. या सन्मान सोहळ्यास अडचणीमुळे काहींना उपस्थित राहता आले नाही अशांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन सन्मान करण्याचा रेणापूर शहर भाजपाने यावेळी जाहीर केले. देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना यावेळी भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

अटलजी - अडवाणी आणि महाजन - मुंडे यांनी भाजपाचे रोपटे लावले. रेणापूरसह राज्यातीलच नव्हे तर देशभरातील हजारो लाखो कार्यकर्त्यांनी जिद्दीने, कष्टाने काम करून भाजपाचे रोपटे जोपासले. कमी काळात भाजपाचा आज वटवृक्ष झाला. जुन्या काळातील कार्यकर्त्यांच्या त्यागातून भाजपा यशोशिखरापर्यंत पोहोचविला असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी अनेक वर्ष रेणापूर विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले मतदार संघाच्या विभाजनानंतर रेणापूर भाग लातूर ग्रामीण मतदार संघात समाविष्ट झाला. मुंडे साहेबांनी रमेशआप्पा यांच्यावर मतदार संघाची जबाबदारी सोपवली तेंव्हापासून लातूर ग्रामीण मध्ये कमळ फुलले पाहिजे सातत्याने संघर्ष केला आणि कार्यकर्त्यांची ही इच्छा यावेळी पूर्ण झाली असल्याचे सांगून भाजपा हा कार्यकर्त्याचा पक्ष आहे मुंडे साहेबांसोबत काम केलेल्या सर्वच जुन्या कार्यकर्त्यांचा सातत्याने मान सन्मान झाला पाहिजे असे बोलून दाखवले.

प्रारंभी रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांनी आपल्या प्रस्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विषद केली चंद्रकांत कातळे यांनी सूत्रसंचालन केले तर ॲड. दशरथ सरवदे यांनी उपस्थित यांचे आभार व्यक्त केले या कार्यक्रमास रेणापूर आणि परिसरातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांची भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जयंती उत्साहात साजरी

लातूर/प्रतिनिधी :-भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांची जयंती डॉ. आंबेडकर पार्क येथे अतिशय उत्साहात, अनुशासनात आणि धम्म विचाराने साजरी करण्यात आली. कार्यक्रमास विविध भागांतील बौद्ध बांधव, सामाजिक कार्यकर्ते, धम्ममार्गी तरुण तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जयंती सोहळ्याची सुरुवात पारंपरिक बौद्ध पद्धतीने त्रिसरण व पंचशीलाचे सामूहिक पठण करून करण्यात आली. त्यानंतर भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून उपस्थितांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले आणि उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.कल्याण कांबळे सर यांनी भैय्यासाहेबांच्या बहुआयामी कार्याचा गौरवपूर्वक वेध घेण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता, बंधुता आणि प्रज्ञा-करुणा या मूल्यांना समाजमनात पोहोचवणे हे त्यांचे अजीवन ध्येय राहिले. भारतातील बौद्ध चळवळींच्या संघटनात्मक उभारणीत, युवकांना धम्ममार्गाकडे प्रेरित करण्यात, तसेच आंबेडकरी विचारसरणीला बौद्ध धम्माच्या आधाराने व्यापक दिशा देण्यात भैय्यासाहेबांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले, असे प्रतिपादन केले.

कांबळे सर पुढे म्हणाले की, भैय्यासाहेब आंबेडकर हे केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुत्र म्हणून नव्हे तर समता-अधिष्ठित समाजनिर्मितीच्या दृढ संकल्पासाठी ओळखले जातात. त्यांच्या कर्तृत्वाने भारतीय बौद्ध समाजाला नवी ऊर्जा व नेतृत्व दिले. म्हणून त्यांना बौद्धाचार्याचे जनक म्हणतात.

याप्रसंगी महासभेच्या सरचिटणीस अभिमन्यू लामतुरे यांनी विविध उपक्रमांची उपक्रमांची घोषणा केली.

यामध्ये, ग्रामीण भागात धम्मजागृती शिबिरे, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन केंद्र, तरुणांसाठी समता सैनिक शिबिरे व लीडरशिप प्रशिक्षण, बौद्ध साहित्याचे डिजिटलायझेशनचा समावेश असल्याचे जाहीर करुन या उपक्रमात ग्रामीण भागातील उपासक व उपासिकांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

यानंतर महिला शाखेच्या जिल्हाध्यक्षा शारदाताई हजारे यांनी संविधान समर्थक महिला मेळावा घेणार असल्याचे जाहीर केले. त्यातून महिलांचे न्याय, हक्क व अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी या मेळाव्याचा मूळ उद्देश असल्याचे सांगितले.

महासभेचे पदाधिकारी यांनी सांगितले की, हे सर्व उपक्रम भैय्यासाहेबांच्या सामाजिक बांधिलकीच्या ध्येयाशी सुसंगत असून आगामी काळात व्यापक स्तरावर राबवले जातील.

दीपप्रज्वलनंतर बुद्धं शरणं गच्छामि, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भैय्यासाहेब आंबेडकर या सामूहिक घोषणेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे एकात्मतेचा संदेश घुमला.

अखेरीस धम्म दीक्षा समितीचे राहुल गायकवाड यांनी भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त धम्म चळवळ गतिमान करण्यासाठी आजी - माजी पदाधिकाऱ्यांसह ग्रामीण भागातील समाजात अधिक धम्म विषयी जागरुकता, शिक्षण, करुणा आणि समतेचे कार्य अखंडपणे चालू ठेवण्याचा संकल्प केला.

सरणतय गाथेनी कार्यक्रमाचा समारोप झाला. याप्रसंगी हिराचंद गायकवाड या माजी पदाधिकाऱ्यांसह समाजातील मान्यवरासह भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा (प.) च्या जनरल व महिला शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# लातूरच्या इतिहासात पहिली वेळ तृतीयपंथी माऊली लातूरकर भाजपमध्ये; महानगरपालिका निवडणुकीला उमेदवारीची मागणी

लातूर-लातूर शहराच्या राजकीय इतिहासात प्रथमच तृतीयपंथी प्रतिनिधी म्हणून माऊली लातूरकर यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी दर्शवली आहे. भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश करून माऊली लातूरकर यांनी ऐतिहासिक पाऊल टाकले आहे.

डॉ. सौ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या देवघरया निवासस्थानी डॉ. अर्चनाताई यांच्या उपस्थितीत शैलेश लाहोटी यांच्या हस्ते माऊली लातूरकर यांनी अधिकृतरीत्या भाजपमध्ये प्रवेश केला. या प्रवेशानंतर त्यांनी लातूर शहरातील इंडिया नगर परिसरातील प्रभाग क्र. १० मधून महानगरपालिका निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे.



यासाठी माऊली लातूरकर यांनी अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची भेट घेऊन प्रभाग १० मधील उमेदवारी अर्ज देण्यात यावा, अशी औपचारिक मागणी केली. तृतीयपंथी समाजाला राजकारणात स्थान मिळवून देण्याच्या दृढनिश्चयातून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

यावेळी बोलत असताना डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी माऊली लातूरकर व त्यांच्या परिवाराचे भाजप परिवारामध्ये स्वागत केले असून करत लातूर शहरात तृतीयपंथी व्यक्तीने प्रथमच राजकीय पातळीवर अशी पुढाकार घेतल्यामुळे या घडामोडीचे स्वागत होत आहे.

# स्व.गोपिनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त नाव्होली जि.प.शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

केज/प्रतिनिधी -एका छोट्याशा



गाव खेड्यातुन दिल्लीचे तख्त गाजवणारे स्व. गोपिनाथरावजी मुंडे साहेब यांची आज जयंती असल्याने व त्यांच्या कन्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रात सर्वत्र सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे असे आदेश आल्याने केज तालुक्यातील भाजपाचे सर्वच कार्यकर्ते तालुक्यातील सर्वच शाळेत शालेय साहित्य, रक्तदान शिबीर, गरीब गरजुंना संसार उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,एकेकाळी बिड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथ्रा गावात एका सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेणारे आणि प्रतिकुल परिस्थितीतून मार्ग काढत शुन्यातून विश्व निर्माण करत राजकारणात आपला ठसा उमटवणारे अर्थात जिल्ह्याची मुलुख मैदानी तोफ म्हणुन ओळखले जाणारे स्व.गोपिनाथराव मुंडे साहेब यांची आज जयंती असल्याने हा कार्यक्रम सर्वत्र साजरा करण्यात येतो. परंतु स्व.गोपिनाथराव मुंडे यांच्या कन्या पर्यावरण मंत्री मा. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना स्व.गोपिनाथराव मुंडे यांची जयंती सामाजिक उपक्रम घेऊन साजरी करण्याचे आदेश दिल्याने केज तालुका भाजपाच्या वतीने तालुकाध्यक्ष मा.श्री.भगवाराव केदार यांच्या मार्गदर्शनाखाली केज तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, सदरच्या कडाक्याच्याची पडल्याने गोरगरीब व गरजु कुटुंब जे की,अगदी गावाबाहेर पालाची झोपडी करुन राहतात. त्यांना ब्लँकेटचे वाटप तसेच शासकीय दवाखान्यात रक्ताचा तुटवडा भासत असल्याने काही ठिकाणी रक्तदान शिबीर असे उपक्रम राबविण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून केज तालुक्यातील नाव्होली येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत काल दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वा. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला वही, पेन,बिस्केट मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला असणारे प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.सदस्य मा. संतोष (दादा) हांगे,पंचायत समितीचे सदस्य तथा भाजपाचे तालुकाध्यक्ष या.श्री.भगवान (आबा) केदार यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी स्व.गोपिनाथराव मुंडे यांच्या जिवनकार्या विषयी माहिती सांगुन जयंतीनिमित्त करण्यात येत असलेल्या उपक्रमाचा उद्देश समजावून सांगत त्यांच्या जिवन कार्याविषयी मार्गदर्शन केले. मा.संतोष (दादा) हांगे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्व.गोपिनाथराव मुंडे यांचे सोबत लाभलेला सहवास, त्यांची शिकवण यावर प्रकाश टाकला मुंडे साहेब ज्यावेळी देशाचे ग्रामविकास मंत्री झाले आणि त्यांच्या स्धागताची तयारी परळी शहरात जोरात सुरु होती. त्याचवेळी त्यांच्या अपघाती निधनाची बातमी कळाली आणि स्वागतला केलेली सर्व तयारी त्यांच्या अंत्ययात्रेत बदलली अशी माहिती सांगताना मात्र त्यांना गहिवरून आल्याने संतोष दादा हांगे यांना आपले आश्रु आवरता आले नाहीत.यावेळी ते भावुक झाले. अध्यक्षीय भाषणात बोलताना मुख्याध्यापक श्री.गोसावी सर यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी स्व.गोपिनाथराव मुंडे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपले भविष्य घडवा असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य हे शाळेसाठी दिलेल्याने मान्यवरांचे आभार मानले. या कार्यक्रमाला गावचे सरपंच प्रतिनिधी मा.श्री. रंजित(बप्पा) बिक्कड,उप सरपंच अंगद देशमुख, से.स.सो.चे चेअरमन मा.श्री.संदिप बिक्कड, शा.व्य.समितीचे अध्यक्ष मा.श्री. प्रदिप बिक्कड, पोलिस बॉईज संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष मा.श्री. तानाजी देशमुख, ग्रामसेवक. मा.श्री. बाबासाहेब हजारे, यांचेसह ग्रामपंचायत सदस्य विलास बिक्कड, संजय बिक्कड, विकास लक्ष्मण बिक्कड, ऊत्रेश्वर शिंदे, यांचेसह कृष्णा बिक्कड (उद्योजक), वसंत बिक्कड, पुरुषोत्तम बिक्कड,लक्ष्मण बिक्कड, मा.पो.पा.नवनाथ बिक्कड, विकास बिक्कड(उद्योजक),ईश्वर बिक्कड, बाळासाहेब बिक्कड,संपत्ती झाडे,पा. पु.क.रमेश बिक्कड, सुरेश गोपाळघरे शाळेचे मुख्याध्यापक मा.श्री. गोसावी सर , कांबळे सर, चाटे सर,बिक्कड सर, केकाण सर,दुधाने मॅडम, मुंडे मॅडम,शिंदे मॅडम,इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व शाळेचे कर्मचारी राजु शेख, इनत्याजबी शेख यांचे सह शाळेतील विद्यार्थी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री गोसावी सर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन कांबळे सर यांनी केले. व आभार केकान सर यांनी मानले.

# उमरी रोड भागातील नागरिकांचा लाईटचा प्रश्न अखेर मार्गी

केज/प्रतिनिधी-केज शहरातील उमरी रोड परिसरामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरातील नागरिकांना सुरळीतपणे लाईट नसायची या भागात लाईटचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनला होता. परंतु याकडे कोणी लक्ष देत नव्हते. काही नागरिकांनी लाईटचा प्रश्न हा राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते डॉ. हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ. सौ.सीताताई बनसोड यांच्याकडे मांडला. उमरी रोड परिसरातील वाढती लोकसंख्या व या भागात अतिशय कमी दाबांमध्ये विज उपलब्ध असायची सातत्याने डीपी जळायचा तर काही वेळा डीपी मध्ये बिघाड असायचा तर काही वेळा फ्युज नसायच्या अशा अनेक अडचणींना या भागातील नागरिकांना सामोरे जावे लागत होते. महावितरण कार्यालयाकडून अनेक वेळा नवीन डीपी मंजूर झालेला असताना जाग्या अभावी नवीन डीपी बसवता येत नव्हता, या भागात नवीन डीपी बसवण्यासाठी जागेचा प्रश्न उद्भवत होता परंतु गटनेते डॉ.हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांनी महावितरण कार्यालयाशी संपर्क साधून सतत पाठपुरावा करून व इरिगेशन कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी संपर्क करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना विनंती करून त्यांच्या कार्यालयाच्या पाठीमागील बाजूस नवीन डीपी बसवण्यासाठी जागा देण्याची विनंती करून पाठपुरावा केला. इरिगेशन कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी डीपी बनवण्यासाठी जागा देण्याचा शब्द हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांना दिला. शुक्रवार रोजी प्रत्यक्षात डीपीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. यापुढे उमरी रोड भागातील व परिसरातील नागरिकांचा लाईटचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे.



या भागात नवीन डीपी बसवण्यासाठी जागेचा मोठा प्रश्न होता तो प्रश्न डॉ.हारुणभाई इनामदार व डॉ. सौ. सीताताई बनसोड यांनी मार्गी लावला. गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या प्रयत्नाला यश आले आहे असे या भागातील नागरिक डीपीचे काम चालू असताना बोलत होते. गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी लाईटचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावल्याबद्दल या भागातील नागरिकांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

# कामगारांच्या हितासाठी नवी मुंबई वंचित च्या वतीने आमरण उपोषण

नवी मुंबई / के. एच. हनवते :-- वंचित




बहुजन आघाडी बेलापूर तालुका तसेच वंचित बहुजन माथाडी कामगार युनियनच्या वतीने गेली चार दिवस झाले नवी मुंबई महानगरपालिकेच्या समोर कामगारांच्या विविध प्रश्नावर वंचितच्या वतीने आमरण उपोषण सुरू असून उपोषणकर्ते : गजानन भोईर (जिल्हाध्यक्ष) वंचित बहुजन माथाडी कामगार युनियन यांची प्रकृती ढासळल्यामुळे त्यांना वाशी हॉस्पिटल येथे ऍडमिट केलेले असून त्याच ठिकाणी वंचित बहुजन आघाडी बेलापूर तालुका अध्यक्ष अँड. उमेश हातेकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपोषण स्थळी उपस्थित असून अनेक कार्यकर्त्यांची पण प्रकृती ढासळत आहे, तरी वंचितच्या सर्व कार्यकर्त्यांना विनंती आहे की, आपण पण उपोषण स्थळी उपस्थित राहून आंदोलनाला जाहीर पाठिंबा द्यावा, आमचे कार्यकर्ते दिवस रात्र थंडीमध्ये आंदोलन करत आहेत आणि नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी मात्र आतमध्ये वातानुकूलित केबिनमध्ये बसून मझा बघत आहेत या संदर्भात आपल्या सर्व कार्यकर्त्यांनी उपोषण स्थळी येऊन त्यांना जाब विचारला पाहिजे जय भीम ! जय वंचित बहुजन आघाडी..!! हमारी मांगे पुरी करो नही तो खुर्ची खाली करो..!!!

# राज्यातील परिचारिकांच्या विविध प्रलंबीत मागण्यांसाठी संघटनेच्या वतीने परिचारिका महामोर्चा

नागपूर :- महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर ही राज्यातील परिचारिकांची एकमेव शासन मान्यता प्राप्त संघटना असून ही राज्यातील परिचारिकांच्या कल्याणा साठी कार्य करत आहे. त्याचबरोबर अनेक वर्षापासून प्रलंबित मागण्याबाबत सातत्याने पाठपुरावा करत आहे. शासनासोबत आतापर्यंत बऱ्याच वाटाघाटी झालेल्या आहेत. परंतु शासनाकडून कुठल्याही मागणीवर आजतागायत ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. याकडे शासनाचे लक्षवेध करण्यासाठी आज दिनांक १२/१२/२०२५ रोजी नागपूर विधानसभेवर मोर्चा काढण्यात येत आहे.

परिचारिका संवर्गाचे सेवाप्रवेश नियम अस्तित्वात नसल्यामुळे परिचारिकांच्या नवीन भरती व पदोन्नती होणे अशक्य आहे. त्यामुळे प्रशासकीय स्तरावरील पदे जसे सहाय्यक अधिसेविका, अधिसेविका, पाठ्यनिर्देशिका, अधिव्याख्याता, प्राचार्य ही मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. महत्त्वाची पदे पदोन्नतीने न मिळाल्याने परिचारिका वर अन्याय होत आहेच, त्याचबरोबर वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अनेक संस्थांचा कार्यभार प्रभारी व उसनवारीवर चालू आहे. रुग्णसेवेसाठी उपलब्ध असलेले मनुष्यबळ परिचर्या महाविद्यालयात उसनवारी तत्त्वावर कामाला ठेवले जात आहे. त्यामुळे पात्र परिचारिका मध्ये प्रचंड असंतोष होण्याबरोबरच रुग्णसेवेचे मनुष्यबळ अपुरे पडत आहे. पात्र परिचारिकांना त्यांना हक्काची पदे हवे आहेत.त्यामुळे अधिसेविका, सहाय्यक अधिसेविका, पाठ्यनिर्देशिका, अधिव्याख्याता, प्राचार्य, उपप्राचार्य या सर्व पदांचे सेवा प्रवेश नियम शासनाने तात्काळ मंजूर करावेत व ही पदे योग्य मार्गाने भरावेत.

राज्यातील सर्व वैद्यकीय संस्थांमध्ये परिचारिकांची मोठ्या प्रमाणात रिक्त पदे आहेत. त्यातच प्रत्येक संस्थेत अनेक नवनविन विभाग व किमान २५० अतिरिक्त खाटा सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे परिचारिकांवर अतिरिक्त ताण पडत आहे. परिचारिकांची ४८८८ पदे भरण्याची परवानगी यापूर्वीच शासनाने दिली आहे. सर्व संस्थांमध्ये तातडीने १००% पद भरती करण्यात यावी. परिचारिकांचे पदनाम बदल मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी मान्य केले आहे. परंतु अद्याप शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही. परिचारिकांचे भत्ते मागील ४० वर्षात वाढले नाहीत. या प्रस्तावावर २०१७ पासून कार्यवाही चालू असून ते ती कार्यवाही जलद गतीने करण्यात यावी. निष्ठा




या व इतर बऱ्याच मागण्यांसाठी संघटनेने माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ साहेब तसेच राज्याचे आरोग्य मंत्री श्री प्रकाश अबिटकर साहेब यांच्या समावेत बैठक घेऊन चर्चाही केली दोन्ही मंत्री महोदयांनी या मागण्या रास्त असून त्या लवकरच सोडवल्या जातील अशी ग्वाही दिली. परंतु त्यापैकी एकही मागणी प्रशासनाकडून सोडवण्यात आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील परिचारिकामध्ये प्रचंड प्रमाणात असंतोष आहे. त्या असंतोषातूनच हा मोर्चा घेऊन महाराष्ट्रातील परिचारिकांचे प्रतिनिधी येथे हजर झालेले आहेत. तरी शासनाने परिचारिकांच्या मागण्यासाठी ठोस पावले उचलावीत अशी मागणी संघटनेचे राज्यकार्याध्यक्ष श्री अरुण कदम, राज्याध्यक्ष डॉ. मनीषा शिंदे, राज्यसरचिटणीस श्रीमती सुमित्रा तोटे, राज्य उपाध्यक्ष श्री बाबा खान, श्री भीमराव चक्रे, सदस्य आशा यादव व महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांनी केली आहे

# ग्रंथालय मागण्या संदर्भात मुख्यमंत्री सकारात्मक : सदाशिव बेडगे

लातूर : महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी ११ डिसेंबर ला मोर्चात सहभागी होण्यासाठी या ऐतिहासिक इतिहासचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्रातील ग्रंथालय कर्मचारी यांना दिलेल्या हाकेला ३००० पेक्षा जास्त संख्येने सहभागी झाले. यासाठी परिषदेचे गंगाधर पोतंगले, विद्यासागर हणमंते, संतोष करमले,सौ.उमा पुदाले, निलेश क्षिरसागर मनोहर गायकवाड,केशव वनंजे, बालाजी कांगणे आदीने खूप परिश्रम घेतले. ग्रंथालय प्रलंबित मागण्या सोडविण्यासाठी मुख्यमत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यासाठी यशवंत स्टेडियम येथून विधान भवन वर मोर्चा काढण्यात आल्याचे महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी सांगितले.

या मोर्चात नाशिक येथील ग्रंथालय चळवळीतील उद्धव ठाकरे शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील यांनी मोर्चात येऊन पाठिंबा देऊन सहभागी झाल्या. यावेळी त्यांनी ग्रंथालय कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.



आमच्या मागण्या संदर्भात मागण्यांचे निवेदन कुणाला द्यायचे आहे हे प्रशासनातील अधिकारी यांनी विचारले असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच निवेदन देण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याशी चर्चा केल्यानंतर आम्हाला निरोप आला. आपण ना.चंद्रकांत दादा पाटील यांना निवेदन देण्यास तयार आहात का ? आम्ही हो म्हटल्यावर सदाशिव बेडगे, सिद्राम मुद्देबिहाळ, मनोहर गायकवाड, श्रीधर स्वामी, विनोद गायकवाड हे पाच जणांचे शिष्टमंडळ विधानभवन मध्ये निवेदन देण्यास गेले असता मंत्री चंद्रकांतदादा पाटील अतिशय चांगल्या मूडमध्ये होते. यावेळी त्यांनी सांगितले की, आपले निवेदन शासनास अगोदर पोहोचल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मागण्या संदर्भात सकारात्मक आहेत. त्याबाबत आपल्या शिष्टमंडळासोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल. ४० टक्के अनुदान वाढ, दर्जा बदल लवकरच आदेश काढण्यात येतील, असे सांगितले असल्याचे सदाशिव बेडगे यांनी मोर्चातील उपस्थितांना सांगितले.

यावेळी सुनिलदत्त पाटील,धोंडिराम जेवूरकर, नरसिंह मिसालोलू, रामचंद्र वग्गे, गिरीश मठपती, सौ.वैशाली दुरगकर,महाराष्ट्रातून बहुसंख्येने कर्मचारी महिला व बंधू उपस्थित होते.

आ.सुधीर मुनगंटीवार व आ.अभिजित वंजारी यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात येणार होता. पण विधानभवन मध्ये महत्वाच्या कामकाजामुळे येता आले नाही. त्यांनी मला अगोदरच पूर्व सूचना दिलेली होती. ११ डिसेंबर तारीख बदलण्याबाबत चर्चा केली होती, पण ११ डिसेंबरची मोर्चाची परवानगी घेतली होती आणि काही जणांनी रेल्वे रिझर्वे शन केल्यामुळे तारीख बदलली नाही. दोघांनी मला शब्द दिला आहे की, शासन स्तरावर सर्वतोपरी सहकार्य करून आपणांस आपल्या मागण्या संदर्भात न्याय मिळवून देण्यात येईल , असे सांगितले असल्याचे सदाशिव बेडगे यांनी म्हटले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.